महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

पानचक्की, औरंगाबाद-४३१००२

Tele-fax: 0240-2401584, 2402366

Website: www.mahawakf.com, Email: ceomsbw@gmail.com


क्रमांक. मरावमं/एसएनटी-२४१/6509 / २०२१ दिनांक. 05 OCT 2021

पहा : १) वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २५ आणि ३२

२) मा.श्री.सय्यद इम्तियाज जलील, खासदार, औरंगाबाद तथा सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांचे पत्र क्र.एमपी/औबाद/कावि/२०२१/१००८ दि.१९/०४/२०२१

३) जिल्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांचे पत्र क्र. वक्फ/एसएनटी-जि.व.अ.-८५/२४८/२०२१ दि.१०/०६/२०२१

४) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, बैठक दि. २५ व २६ जून २०२१ विषय क्र.१७ ठराव क्र.१७ (वक्फ मंडळाची बैठक दि.०१/०९/२०२१ व ०३/०९/२०२१ मध्ये सदरील ठराव कायम करण्यात आला.)

## आदेश

औरंगाबाद शहरातील मस्जीदशी संबंधित वक्फ मिळकत आमखास मैदान सर्वे नं. २१० एकुण क्षेत्र २९ एकर ०९ गुंठे ची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार क्र.MSBW/ABD/५२६/२०१३ दि.२५/०६/२०१३ अन्वये वक्फ मंडळात करण्यात आलेली आहे. सदरील आमखास मैदान मध्ये एक सुसज्ज भव्य स्टेडियम तयार करण्यासाठी केंद्र सरकारच्या क्रिडा विभागाकडून निधी उपलब्ध करुन स्टेडियम निर्माण करण्याचे काम सुरु करण्यासाठी व खेळाडूंच्या भवितव्यासाठी अद्यावत स्टेडियम बांधणेकरिता मा. श्री. सय्यद इम्तियाज जलील, खासदार औरंगाबाद तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी दि. १९/४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये या कामी नाहरकत प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे. संदर्भ क्र. ३, अन्वये जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांनी या प्रकरणी अहवाल सादर केला असुन आमखास मैदानावर युवक खेळाडूंच्या भवितव्यासाठी अद्यावत स्टेडियम निर्माण करण्यासाठी बांधकाम नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत शिफारस केली आहे. सदरील कामासाठी वक्फ मंडळाच्या दि.२५ व २६/०६/२०२१ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. १७ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यता दिलेली आहे व दि.१/०९/२०२१ व ०३/०९/२०२१ च्या बैठकी मध्ये ठराव क्र.२ अन्वये सदरील ठराव कायम करण्यात आला आहे.

उपरोक्त प्रमाणे वक्फ मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार औरंगाबाद येथील सर्वे नं. २१०, आमखास मैदानावर एक सुसज्ज भव्य स्टेडियम तयार करण्यासाठी केंद्र/राज्य सरकारच्या क्रिडा किंवा इतर कोणत्याही विभागाकडून वा इतर स्त्रोतांकडून निधी उपलब्ध करुन स्टेडियम निर्माण करण्याचे काम सुरु करण्यासाठी मा.श्री.सय्यद इम्तियाज जलील, खासदार, औरंगाबाद तथा सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना खालील अटीच्या अधिन राहून नाहरकत प्रमाणपत्र देण्यांत येत आहे.

१. सदरील कामामुळे संबंधित वक्फ संस्था/वक्फ मंडळाचे मालकी हक्कात किंवा इतर कोणत्याही अधिकारात कुठलाही बदल होणार नाही व यावर वक्फ संस्था/वक्फ मंडळ यांचा मालकी अधिकार व इतर सर्व अधिकारी राहतील.

२. आमखास मैदानावर एक सुसज्ज भव्य स्टेडियम तयार करण्यासाठी केंद्र/राज्य सरकारच्या क्रिडा किंवा इतर कोणत्याही विभागाकडून वा इतर स्त्रोताकडून निधी उपलब्ध करुन घेण्यात येईल.

३. आमखास मैदानावर एक सुसज्ज भव्य स्टेडियम तयार करण्यासाठी नोंदणीकृत अभियंता कडून स्टेडियम बांधकाम आराखडा व नकाशा तयार करुन महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मान्यतेसाठी

Scanned by CamScanner

सादर करण्यात येईल, व तशी मान्यता प्राप्त झाल्यानंतरच प्रत्यक्ष बांधकामास सुरवात करण्यात येईल.

४. सदर स्टेडियमच्या बांधकामासाठी (महापालिका व इतर) तसेच बांधकामानंतर परिचालनासाठी (अग्निशमन दलाची इ.) आवश्यक असणा-या सर्व परवानग्या त्या त्या वेळी घेण्याची जबाबदारी नाहरकत प्रमाणपत्र धारकाची राहील.

५. स्टेडियमचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर लगेचच सदरील स्टेडियम त्याच्या व्यवस्थापन व परिचालनासाठी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ताब्यात देण्यात येईल व या संदर्भात सदरच्या नाहरकत प्रमाणपत्र धारकाला कोणतेही अधिकार प्राप्त असणार नाहीत.

05/10/2021

(अनिस शेख )
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ
औरंगाबाद

प्रति,

**मा.श्री.सय्यद इम्तियाज जलील,**
खासदार, औरंगाबाद तथा सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद
प्रत माहितीस्तव अग्रेषित,

१. मा.अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
३. मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गुलशन महल कंपाऊंड, औरंगाबाद
४. मा.आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद
५. मा.पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
६. खाजगी सचिव, मा.मंत्री (अल्पसंख्याक), मंत्रालय, मुंबई-३२
७. पोलीस निरिक्षक, बेगमपुरा पोलीस स्टेशन, औरंगाबाद
८. जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांना देवून सुचित करण्यात येते की, आमखास मैदानावर एक सुसज्ज भव्य स्टेडियम तयार करण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे व कार्यवाही पुर्ण करुन सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.
९. लेखा अधिक्षक, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद

05/10/2021

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ
औरंगाबाद

Scanned by CamScanner